# भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी
## अग्निशमन व आपत्कालीन सेवा

**प्रस्तावना-**

**विषय- जिल्हा वार्षीक योजना निधीतुन अग्निशमन विभागाच्या सक्षमीकरणाकरता विविध प्रकारचे अग्निशमन वाहने खरेदी करणेबाबत.**

भिवंडी शहराचा भौगोलीक परिस्थितीचा विचार करता तसेच असलेले उदयोग धंदे जसे पावरलुम, डाईंग, मनी कारखाने व इतर छोटेमोठे उदयोगधंदे यांचा विचार करता तसेच भिवंडी मनपाहद्दीत असलेल्या होत असलेल्या उंच इमारती यांचा विचार करता तसेच भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका हद्दीलगत असलेल्या ग्रामीन भागामध्ये असलेल्या रसायनांचे गोडावुन, कारखाने, कंपनी, व निरनिराळया प्रकारचे उद्योग धंदे व्यवसायांना आगीसारखी किंवा इतर दुर्घटना घडल्यास त्या परिसरात अग्निशमन सेवा उपलब्ध नसल्याने भिवंडी मनपा अग्निशमन दलाला सेवा पुरवावी लागते यामुळे अग्निशमन विभागाच्या सक्षमीकरणांकरिता विविध प्रकारची अग्निशमन वाहने मिनी फायर टेंडर -०५ नग, फायर टेंडर-५ नग, फोम टेंडर-०४ नग, वॉटर ब्राउझर-०१ नग, रेस्क्यु टेंडर-०१ नग खरेदी करण्याकरिता जिल्हा वार्षीक योजना निधिमधुन निधी उपलब्ध करुन देण्याकरिता प्रस्ताव पाठविण्यात आलेला होता. सदर प्रस्तावाला जिल्हा नियोजन अधिकारी यांच्याकडुन आवश्यक अग्निशमन वाहने खरेदी करण्याकरिता रु. ३२,२९,१५,०००/- ला प्रशासकिय मान्यता दिलेली आहे. सदर अग्निशमन वाहने खरेदी करण्याकरिता बाजारभावानुसार रु.३२,२९,१५,०००/- (अक्षरी- बत्तीस कोटी एकोनतीस लाख पंधरा हजार रुपए मात्र) अंदाजपत्रकीय रक्कमेला प्रशासकिय, आर्थीक व तांत्रिक मान्यता मिळणेकरिता प्रस्ताव तयार करण्यात आले आहे. त्यास मा.उपआयुक्त (मुख्या),मुख्य लेखा परिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, अतिरिक्त आयुक्त यांची शिफारस आहे.

सदय स्थितीत मा.महासभा व मा.स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक तथा आयुक्त यांना आहेत. त्यानुसार प्रस्ताव मान्यतेस सविनय सादर,

**ठराव क्रं.** ५०८ **दिनांक-** ८/१०/२०२४

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक प्रतिनि-२०२३/प्र.क्र.११९/नवी-१४, दिनांक-०९/०६/२०२३ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ अ (१अ) तरतुदी नुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त भिवंडी नि.शहर महानगरपालिका,अग्निशमन अधिकारी यांनी प्रस्तावित केल्यानुसार विविध प्रकारची अग्निशमन वाहने मिनी फायर टेंडर -०५ नग, फायर टेंडर-५ नग, फोम टेंडर-०४ नग, वॉटर ब्राउझर-०१ नग, रेस्क्यु टेंडर-०१ नग खरेदी करणेकरिता बाजारभावानुसार रु.३२,२९,१५,०००/- (अक्षरी- बत्तीस कोटी एकोनतीस लाख पंधरा हजार रुपए मात्र) अंदाजपत्रकीय रक्कमेच्या होणा-या खर्चास प्रशासकिय, आर्थीक व तांत्रिक मान्यता देत आहे.

प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि. शहर महानगरपालिका

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका,भिवंडी.

प्रस्तावना:

**विषय :- खालील कामांना प्रशासकिय ठरावांची मंजूरी मिळणे बाबत.**

प्रभाग समिती क्र.४ च्या कार्यक्षेत्रातील खालील नमूद केलेली कामे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना" अंतर्गत प्रस्तावीत केलेली आहेत. तरी सदरची कामे प्रशासकिय मान्यतेसाठी व निधी मागणीसाठी मा. जिल्हाधिकारी सो, ठाणे. यांचेकडे पाठविणेकामी प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक तसेच अति. आयुक्त यांनी केलेल्या शिफारसी प्रमाणे मा. आयुक्त महोदय यांनी पूर्व मान्यता दिलेली आहे. पुढील कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये प्रशासकिय ठराव करणेकामी मंजूरीस्तव सविनय सादर.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | वॉर्ड क्र.२० साठे नगर मध्ये अशोक पाटोळे यांच्या घरापासून ते देवजनीगर रोड बलराज कोंडा बिल्डीग पर्यत गटार व पाय-या बनविणे व चेकर्स लादी बसविणे. | २४९९२२६ |
| २ | वॉर्ड क्र.२० मध्ये साठे नगर मध्ये खरात यांच्या घरापासून ते संतोष पवार यांच्या घरापर्यत गटार व पाय-या बनविणे व चेकर्स लादी बसविणे | २४९८४६२ |
| ३ | वॉर्ड क्र.२० मध्ये साठे नगर येथील किसन धोत्रे घराजवळ शाळा क्र.४३ जवळील कंपा वॉल बांधणे. | २४९५४३७ |
| ४ | वॉर्ड क्र.२० मध्ये साठे नगर पाण्याच्या टाकीजवळ माती भरणी करुन पेव्हर ब्लॉक लावून पायवाट तयार करणे. | २४९८९५९ |
| ५ | वॉर्ड क्र.२० साठे नगर येथे पाण्याच्या टाकीपासून ते बलराज कोंडा बिल्डीग पर्यत आर.सी.सी.कंम्पा.करणे | २४९४२४२ |
| ६ | वॉर्ड क्र.२० मधील नारपोली तलावाची भिंत बांधणे व पायवाट बांधणे | २४९८२४७ |
| ७ | वॉर्ड क्र.२० नर्मदानगर येथे नविन सार्वजनिक शौचालयाजवळ ड्रेनेज साठी गटार बनविणे | २४९८५७५ |
| ८ | वॉर्ड क्र.२० मध्ये साठे नगर स्मशानभूमी परिसर सुशोभिकर ण व संरक्षण भिंत ऊभारणे | ९९९०२४० |
| ९ | वॉर्ड क्र.२० कामतघर साठे नगर परिसरात सी.सी.रस्ते व गटार बनविणे | ४९९५५६२ |
| १० | वॉर्ड क्र.२० मध्ये बालाजी नगर हनुमान मंदीर येथे गटार व पायवाट बनविणे | १४९६५०८ |
| ११ | वॉर्ड क्र.२० छत्रपती शिवाजी नगर साठे नगर येथे गटार व पायवाट बनविणे | १४९९३११ |
| १२ | वॉर्ड क्र.२० पटेल किराणा येथे संरक्षण भिंत बांधणे | ३९९७३८३ |
| १३ | वॉर्ड क्र.२० मध्ये आनंत नगर तुकाराम नगर नारपोलि येथे रस्ता व गटार बांधणे | १४९६०२५ |
| १४ | वॉर्ड क्र.२० भंडारी शाळेजवळ गटार व पायवाट बनविणे | १४९६१३० |
| १५ | वॉर्ड क्र.२० मध्ये भंडारी कंम्पा.बालाजी नगर येथे गटार व पायवाट बनविणे | १४९९८११ |
| १६ | वॉर्ड क्र.२० भंडारी कंम्पा. मुख्य सस्ता गटार व पायवाट बनविणे | १४९२८७० |
| १७ | वॉर्ड क्र.२० भंडारी चौक यंशवत शेठ ऑफिस च्या पाठीमागे गटार व | १४९६३८२ |

| | | |
|---|---|---|
| | पायवाट बनविणे | |
| | एकुण | ४६९४३३७० |

ठराव क्रः- ५९९ दिनांक ८/१० /२०२४

"साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधार योजना" या शासन निधी अंतर्गत सदर कामाचे रक्कम रुपये रु. **४६९४३३७०/-** मात्रचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरीता मा. जिल्हाधिकारी सो,ठाणे. यांचेकडे पाठविणेकामीच्या प्रस्तावास प्र. शहर अभियंता, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, मुख्य लेखापरिक्षक तसेच अति. आयुक्त यांनी शिफारसी केलेली आहे.

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र.एम.सी.ओ. २०२०/प्र.क्र.७१ (भाग- २) नवि-१४, दि.०६ जुन २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ (१अ) व (1ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य प्रशासक तथा आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७३ (क) नुसार वरिल नमूद कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय ठरावाची मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि. महानगरपालिका, भिवंडी

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी बाक (BENCH) पूरवणे.**

उपरोक्त विषयांस अनुसरुन नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजने अंतर्गत महाराष्ट्र शासन, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२०२४/प्र.क्र.३७/का.१४११ दि.०१/०७/२०२४ या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या परिक्षेत्रात नागरी सेवा व सुविधेची कामे करणे (महानगरपालिका) या योजनेअंतर्गत शासन निर्णय, नियोजन विभाग दिनांक २८ मार्च,,२०२२ मधील परिच्छेद ३ (ब) नुसार भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका अंतर्गत वरील शासन निर्णयासोबत दिलेल्या परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या रु.२५.०० कोटी एवढया किंमतीच्या कामांची थेट शासन स्तरावरुन निवड करण्यात आली आहे. सदर यादीतील अनु क्रं.२ मध्ये विषयांकीत काम नमुद असुन सदर कामाचे अंदाजपत्रक सादर करणे अपेक्षित आहे. त्यामुळे सदर कामांस खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवुन शासन निर्णयानुसार मा.जिल्हाधिकारी सो यांजकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

विषयांकीत कामी रक्कम रु.९९,९९,६३३/-(अक्षरी रु.नव्यांनवद लाख नव्यांनवद हजार सहाशे तेहतीस रु. मात्र) खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त यांनी दि.११/०७/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :-** ६०० **दिनांक :-** 06/10 **/२०२४**

भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी बाक (BENCH) पूरवणे याकामी रु.९९,९९,६३३/- (अक्षरी रु.नव्यांनवद लाख नव्यांनवद हजार सहाशे तेहतीस रु. मात्र) खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ- २०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, रु.९९,९९,६३३/- (अक्षरी रु.नव्यांनवद लाख नव्यांनवद हजार सहाशे तेहतीस रु. मात्र) खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
बांधकाम विभाग

**प्रस्तावना :-**

**विषय :- भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी बाक (BENCH) पूरवणे.**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु.९९,९९,६३३/- करिता ई-निविदा सुचना क्र.२०/२०२४-२५, टेंडर नं.१०५९८११ दिनांक २६/०७/२०२४ ते ०२/०८/२०२४ रोजी दु .४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. दि.०९/०८/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली असुन या कामी ३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक १९/०८/२०२४ रोजी दु.१२.५४ मि.उघडण्यात आली असून एकूण पात्र ३ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे.क्षत्रिय इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मुंबई. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.०० टक्के जादा दराने | १,०२,९९,६२२.१७ |
| **२** | **मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.६६० टक्के कमी दराने** | **९६,३३,६४६.६०** |
| ३ | हिमालय मनोहर पाटील, भिवंडी | अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.२०० टक्के **कमी** दराने | ९७,७७,६४१.३२ |

उपरोक्त तौलनिक तक्त्या नुसार मे. मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई. यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.६६० टक्के कमी दराने रक्कम रु. ९६,३३,६४७/- (रुपये श्यांनवद लाख तेहतीस हजार सहाशे सतेचाळीस मात्र ) इतक्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** ६०७ **दिनांक :-** ८/१० **/२०२४**

मे. मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई. यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.६६० टक्के कमी दराने रक्कम रु. ९६,३३,६४७/- (रुपये श्यांनवद लाख तेहतीस हजार सहाशे सतेचाळीस मात्र ) च्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी पूर्व मतदार संघातील विविध ठिकाणी बाक (BENCH) पूरवणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे. मानसी कंन्स्ट्रक्शन, मुंबई यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका.**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**
**बांधकाम विभाग**

**<u>प्रस्तावना</u> :-**

**विषय :- भिवंडी शहरातील वॉर्ड क्रं.११ नागांव मधील विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज बनविणे. (महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत)**

मा.श्री.सुभाष माने, जिल्हा प्रमुख शिवसेना, भिवंडी यांनी भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, करीता "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर"या योजनेअंतर्गत निधी बाबत दि.२४/११/२०२३ च्या पत्रान्वये मागणी केली आहे. त्या अनुषंगाने विषयांकीत काम "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर"या योजने अंतर्गत प्रस्तावित करणेबाबत महाराष्ट्र शासन जिल्हा नियोजन समिती,जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे यांचेकडील पत्र,जा.क्रं.जिवियो/नगरोत्थान/का-४/२०२३/२४/३४५८दि.२९/११/२०२३.च्या पत्रान्वये कळविणेत आले आहे.सदरचे काम संदर्भिय पत्रामधील विवरणपत्रात क्रं.२ वर असुन सदर कामाचे अंदाजपत्रक सादर करणे अपेक्षित आहे. सदर योजनेअंतर्गत जिल्हा नियोजन समितीचा ७०% हिस्सा व महानगरपालिकेचा ३०% हिस्सा राहणार आहे. विषयांकीत ठिकाणी पहाणी केली असुन वॉर्ड क्रं.११ नागांव मधील विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज बनविणे आवश्यक आहे.

विषयांकीत कामी रक्कम रु.४९,९९,५६७/- (अक्षरी रु.एकोनपन्नास लाख नव्यांनव्वद हजार पाचशे सदुसष्ठ रु. मात्र) खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त यांनी दि.१५/०२/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :-** ६०२ **दिनांक :-** ८/१० **/२०२४**

भिवंडी शहरातील वॉर्ड क्रं.११ नागांव मधील विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज बनविणे याकामी रक्कम रु.४९,९९,५६७/- (अक्षरी रु.एकोनपन्नास लाख नव्यांनव्वद हजार पाचशे सदुसष्ठ रु. मात्र) खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, रक्कम रु.४९,९९,५६७/- (अक्षरी रु.एकोनपन्नास लाख नव्यांनव्वद हजार पाचशे सदुसष्ठ रु. मात्र) खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी
बांधकाम विभाग

प्रस्तावना :-

**विषय :- भिवंडी शहरातील वॉर्ड क्रं.११ नागांव मधील विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज बनविणे. (महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान जिल्हास्तर योजने अंतर्गत)**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु.४९,९९,५६७/- करिता ई-निविदा सुचना क्र.०८/२०२४-२५, टेंडर नं.१०५५६५३ दिनांक १६/०७/२०२४ ते २५/०७/२०२४ रोजी दु.४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. दि.३१/०७/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली असुन या कामी २ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक १९/०८/२०२४ रोजी दु.१२.३९ मि.उघडण्यात आली असून एकूण पात्र २ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| **१** | **तुषार मोहन चौधरी, भिवंडी.** | **अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने** | **४९,९९,०६६.६३** |
| २ | सुशिल लक्ष्मण गायकवाड, भिवंडी. | अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.०० टक्के जादा दराने | १४,९९,३७१.६३ |

उपरोक्त तौलनिक तक्त्या नुसार तुषार मोहन चौधरी, भिवंडी यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने रक्कम रुपये ४९,९९,०६७/-(रुपये एकोनपन्नास लाख नव्यांनवद हजार सदुसष्ठ) इतक्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** 603 **दिनांक :-** 8/10 **/२०२४**

तुषार मोहन चौधरी, भिवंडी यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१० टक्के कमी दराने रक्कम रु. ४९,९९,०६७/- (रुपये एकोनपन्नास लाख नव्यांनवद हजार सदुसष्ठ) च्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, भिवंडी शहरातील वॉर्ड क्रं.११ नागांव मधील विविध ठिकाणी नविन गटार व पाथवेज बनविणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार तुषार मोहन चौधरी, भिवंडी यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

(अजय वैद्य)
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका.**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**
**बांधकाम विभाग**

**<u>प्रस्तावना</u> :-**

**विषय :- प्रभाग समिती क्रं.1 वॉर्ड क्र.4 येथील अल्पसंख्याक बहुल भागातील तय्यब मस्जीद जवळील फजलूर रहमान हॉल (समाज मंदीर) नुतणीकरण करणे.**
**(अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम निधी २०२३-२४)**

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,करीता "अल्पसंख्यांक बहुल नागरी क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम सन २०२३-२४" या योजनेअंतर्गत विषयांकीत कामास शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने संदर्भिय शासन निर्णय सोबतच्या विवरणपत्रात क्रं.२८२ वर प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड क्र.४ येथील अल्पसंख्याक बहुल भागातील तय्यब मस्जीद जवळील फजलूर रहमान हॉल (समाज मंदीर) नुतणीकरण करणे हे काम नमुद असुन सदर कामाचे अंदाजपत्रक सादर करणे अपेक्षित आहे. त्यामुळे सदर कामांस खर्चाच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-याची मान्यता घेवुन शासन निर्णयानुसार मा.जिल्हाधिकारी सो यांजकडे प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक आहे.

विषयांकीत कामी रक्कम रु.१,९९,९८,२३६/- (अक्षरी रु.एक कोटी नव्यांनवद लाख अठयांनवद हजार दोनशे छत्तीस रु.) मात्र खर्चाचा प्रस्ताव सादर केला असता त्यास मा.आयुक्त यांनी दि.२९/०२/२०२४ रोजी मंजुरी दिली आहे. तरी सदरचा प्रस्ताव प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :-** ६०४ **दिनांक :-** ८/१० /२०२४

प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड क्र.४ येथील अल्पसंख्याक बहुल भागातील तय्यब मस्जीद जवळील फजलूर रहमान हॉल (समाज मंदीर) नुतणीकरण करणे याकामी रक्कम रुपये रु.१,९९,९८,२३६/- (अक्षरी रु.एक कोटी नव्यांनवद लाख अठयांनवद हजार दोनशे छत्तीस रु.) मात्र खर्चाचा प्रस्ताव मंजुरीस सादर केला आहे. त्यास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, रु.१,९९,९८,२३६/- (अक्षरी रु.एक कोटी नव्यांनवद लाख अठयांनवद हजार दोनशे छत्तीस रु.) मात्र खर्चाच्या प्रस्तावास प्रशासकीय मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका,भिवंडी**
**बांधकाम विभाग**

**प्रस्तावना :-**

**विषय :- प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड क्र.४ येथील अल्पसंख्याक बहुल भागातील तय्यब मस्जीद जवळील फजलूर रहमान हॉल (समाज मंदीर) नुतणीकरण करणे.**

उपरोक्त विषयांकित कामी अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,९९,९८,२३६/- करिता ई-निविदा सुचना क्र.३३/२०२४-२५, (दुसरा कॉल) टेंडर नं.१०६५८८७ दिनांक ०६/०८/२०२४ ते १३/०८/२०२४ रोजी दु .४.०० वाजे पर्यंत बी-१ पध्दतीची ई निविदा मागविण्यात आली आहे. दि.२०/०८/२०२४ रोजी लिफाफा १ तांत्रिक बीड उघडण्यात आली असुन या कामी २ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. मे.क्षत्रिय इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. मुंबई यांची कागदपत्रे अपुर्ण असल्याने निविदा समितीने त्याची निविदा अपात्र ठरविली आहे. सदर निविदेचा दुसरा कॉल असल्याने पात्र १ निविदेचा शासन निर्णयानुसार निविदा उघडुन प्रचलित कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही करता येईल त्यानुसार लिफाफा २ फायनानशियल बीड दिनांक २६/०८/२०२४ रोजी दु.१२.५४ मि.उघडण्यात आली असून एकूण पात्र १ निविदांचा तौलनिक दर तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाकाराचे नांव | निविदेतिल दर (टक्केवारी) | निविदेतील दराची रक्कम |
|---|---|---|---|
| १ | मे.शिवलाल भिकाजी, मुंबई | अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६०० टक्के कमी दराने | १,९८,७८,२४५.४४ |

उपरोक्त तौलनिक तक्त्या नुसार शिवलाल भिकाजी, मुंबई यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६०० टक्के कमी दराने रक्कम रु. १,९८,७८,२४५/- (रु. एक कोटी अठयांनवद लाख अठयात्तर हजार दोनशे पंचेचाळीस मात्र ) इतक्या खर्चाची निविदा संविदा करणे कामाच्या प्रस्तावास शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे मा.आयुक्त महोदय यांनी मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करणे कामी प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव क्रं. :** 804 **दिनांक :-** 8/10 **/२०२४**

मे.शिवलाल भिकाजी, मुंबई यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.६०० टक्के कमी दराने रक्कम रु. १,९८,७८,२४५/- (रु. एक कोटी अठयांनवद लाख अठयात्तर हजार दोनशे पंचेचाळीस मात्र )च्या खर्चाची निविदा मंजुरीस शहर अभियंता, मुख्य लेखापरिक्षक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तसेच अति.आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीप्रमाणे महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग,मंत्रालय यांचेकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१/(भाग-२) नवि-१४,दिनांक ०६ जुन २०२२ अनव्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ (१अ) मधिल तरतुदीच्या अनुषंगाने मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी अजय वैद्य, प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, प्रभाग समिती क्रं.१ वॉर्ड क्र.४ येथील अल्पसंख्याक बहुल भागातील तय्यब मस्जीद जवळील फजलूर रहमान हॉल (समाज मंदीर) नुतणीकरण करणे याकामी सर्वात कमी दराचे निविदाकार मे.शिवलाल भिकाजी, मुंबई यांचे समवेत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ७३ (क) अन्वये संविदा करण्यास मंजुरी देत आहे.

**(अजय वैद्य)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका.**